नाव: विनया चंद्रकांत शेवाळे
इयत्ता : ११ वी
तुकडी : B ( वाणिज्य शाखा)
हजेरी क्र :- 540

## ज्ञानपीठ पुरस्कार ( कुसुमाग्रज)

२७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे श्रेष्ठ कवी श्री. विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले. आणि मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम केले. आपल्या मातृभाषेला गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवस म्हणून 'मराठी राजभाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. वि. स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळणारे ते दुसरे साहित्यिक होत पर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. भालेराव यांनी कवी शिरवाडकरांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले, केवळ कवी असलेले वि. वा शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले.

2021/2/27 12:4

वि. वा. शिरवाडकर यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान' नावाची संस्था उभारण्यात आली. त्यांच्या नाशिकमधील टिळकवाडी येथील निवासस्थानी आता मराठी पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे.

सामाजिक अन्याय व विषमता या विषयांवर कुसुमाग्रजांनी त्यांच्या लिखाणातून कठोर टीका केली. "साहित्यकाने सामाजिक बांधिलकी मानली पाहिजे." या मताचा त्यांनी पुरस्कार केला. नाटक, कादंबरी, कथा, लघुनिबंध इ. साहित्यप्रकार त्यांनी हाताळले.

अहंकारामुळेच स्वत:ते स्वत्व बाहेर फुलवीत करण्याचा एक आंतरिक आग्रह त्यांच्या ठिकाणी उत्पन्न होतो. अहंकाराची ही प्रवृत्ती नुसत्या अविष्काराने नव्हे तर वर्चस्वाने समाधान पावते. हे वर्चस्व लेखकाला जवळ व दूर प्रत्यक्षात वा अप्रत्यक्षात असलेल्या वाचकांच्या संदर्भात प्राप्त होते.